# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर


| | |
|---|---|
| सार्वजनिक आरोग्य अभियंता यांचे कार्यालय, ड्रेनेज विभाग.<br>फोन नं. (०२१७) २७४०३५०<br>ईमेल - drainsmc@gmail.com | "इंद्रभुवन",<br>पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन, सोलापूर - ४१३००१. |


**जा.क्र. साआअ/जनि/ ९२१**
**दि. १२/१०/२०१८.**

## कार्यादेश

प्रति,
दास ऑफशोअर इंजिनिअरींग प्रा. लि.,
सागर उदय, प्लॉट नं. F-३, सिडको भवनच्या मागे,
(अग्रोळी) सीबीडी, बेलापूर,
नवी मुंबई - ४००६१४.

**विषय - केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान (AMRUT) अंतर्गत सोलापूर शहर भुयारी गटार योजना.**

Solapur City Underground Sewerage Scheme Under AMRUT Mission (For Sewerage Zone I To IV, VI & IX To XIII)

(Providing, Lowering, Laying, Jointing and Testing Sewage Collection System, Rising Main, Construction of Sump and Pump House, STP Cap. 20.00 MLD & 15.50 MLD Based on MMBR Technology.)

संदर्भ -
१) सोमपाचे दि.१४/१०/२०१७ रोजीचे ई - निविदा बाबतचे जाहिर प्रसिध्दिकरण.
२) दि.२६/०२/२०१८ रोजीचे वित्तीय लिफ़ाफ़ा.
३) सोमपा कडून आपणांस दि.२७/०२/२०१८ रोजीचे वाटाघाटी करणेकरिता दिलेले पत्र.
४) आपणांकडून दि.२७/०२/२०१८ रोजीने अंतिम निविदा दराबाबत दिलेले पत्र.
५) मा. आयुक्त यांची दि.१४/०३/२०१८ ने मक्ता मंजुरीस मान्यता.
६) मा. सर्वसाधारण सभेची ठराव क्र. १ दि.०७/०४/२०१८ ने मक्ता मंजुरीस मान्यता.

F:\Hibare 18 a\Amrut\Stnd\W O F.doc

Scanned by CamScanner

७) श्री. संतोष अर्जुन कांबळे विरुध्द सोमपा व इतर यांचे रिट पिटीशन क्र.५७०२/२०१८ मधील दि.२६/०९/२०१८ रोजी मे. उच्च न्यायालयाने वर्कऑर्डर देणेंस असलेली स्थगिती (स्टे) उठविलेबाबतचे दिलेले निर्णय.

८) निलेश पोतदार, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे क्र. अमृत-२०१८/प्र.क्र.१७५/नवि-३३, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि.२६/०९/२०१८ रोजीचे मान्यता पत्र.
(राज्यस्तरीय तांत्रिक समिती - SLTC - मान्यता निर्णय)

९) मा. आयुक्त यांची दि.२८/०९/२०१८ रोजीची वर्कऑर्डर देणेंस मान्यता.

१०) आपणांस सोमपा कडून जा.क्र.साआअ/जनि/४८९ दि.२८/०९/२०१८ रोजी दिलेले सूचना आदेश (सुरक्षित रक्कम भरणे व करारपत्र करणेबाबत).

११) आपण दि.०४/१०/२०१८ रोजी पत्राव्दारे सो.म.पा. कडे सादर केलेली सुरक्षित रकमेपोटी अभ्युदोय को. ऑप. बॅक लि. नवी मुंबई या बॅकेची Ref No : ०२२/CBD/BG/०२/२५१२/२०१८-१९ दि.०३/१०/२०१८ रोजीची बॅक गॅरंटी.

१२) आपणांस सोमपा कडून जा.क्र.साआअ/जनि/८६२ दि.०४/१०/२०१८ रोजी दिलेले पत्र (निविदेच्या विधीग्राह्यता कालावधी - Validity Period वाढवून देणेंबाबत)

१३) आपले दि.०४/१०/२०१८ रोजीचे निविदेच्या विधीग्राह्यता कालावधी - Validity Period वाढवून दिलेबाबतचे पत्र.

१४) आपले सोमपा समवेत दस्तऐवज अनुक्रमांक: सपउ१-४७१९-२०१८ दि.१२/१०/२०१८ रोजीचे नोंदणीकृत (रसिस्टर्ड) करारपत्र.

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरुन वरील संदर्भानुसार या कार्यादेशव्दारे आपणांस कळविणेंत येते की,

विषयांकित नमूद प्रकरणीं संदर्भ क्र. १ अन्वये सोमपाकडून केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत सोलापूर शहर भुयारी गटार योजनेतील स्थापत्य कामाचे र.रु.१७४,३८,४५,९८५/- रकमेचे ई - निविदा मागविणेंत आलेले होते. या कामासाठी आपण निविदा भरलेली होती. तद्नंतर संदर्भ क्र. २ अन्वये सदर निविदेचा वित्तीय लिफ़ाफ़ा उघडणेंत आले असता आपण सादर केलेले निविदा दर हे सर्वात कमीचे (L१) आहेत. त्याअनुषंगाने आपण दिलेल्या दराबाबत वाटाघाटीसाठी संदर्भ क्र. ३ चे पत्रान्वये आपणास विचारणा केली असता सादर केलेले दर हे अंतिम असल्याचे संदर्भ क्र. ४ चे पत्रान्वये आपण कळविलेले आहे.

त्यानुसार सदर कामास कार्यादेश देणेसाठी संदर्भ क्र. ५ चे मा. आयुक्त यांचे मान्यतेने सविस्तर प्रस्ताव मा. सर्व साधारण सभेकडे सादर केला असता संदर्भ क्र. ६ अन्वये मा. सर्व साधारण सभेची ठराव क्र. १ दि.०७/०४/२०१८ अन्वये आपण निविदेत दिलेनुसार मक्त्याच्या रकमेपेक्षा २.७० % कमी या दराने आपले नांवे मक्ता मंजूर करणेत आलेला आहे.



Scanned by CamScanner

परंतु दरम्यानचे कालावधीत संतोष अर्जुन कांबळे यांनी सो.म.पा. व इतर व आपण यांचे विरुध्द मे. उच्च न्यायालयातून रिट पिटीशन क्र.५७०२/२०१८ दाखल केली. त्यांमध्ये मे. उच्च न्यायालयाकडून दि.०४/०६/२०१८ रोजी याचिकेमध्ये वर्कऑर्डर देणेंस स्थगिती (स्टे) देणेंत आला. त्यांमुळे शासनाकडील SLTC कडून वर्कऑर्डर देणेंस अंतिम मान्यता देणेंत आलेली नसलेने सोमपा कडून आपणांस वर्कऑर्डर देणेंत आलेली नाही. परंतु मे. उच्च न्यायालयात सो.म.पा. कडून सदर केस संदर्भात वेळोवेळी सुनावणी झालेली असून सध्या संदर्भ क्र. ७ अन्वये दि.२६/०९/२०१८ रोजी मे. उच्च न्यायालयात झालेल्या सुनावणी अंती मे. उच्च न्यायालयाने वर्कऑर्डर देणेस दिलेली स्थगिती (स्टे) उठविणेत आलेली आहे. तसेच सदर दि.२६/०९/२०१८ रोजीचे सुनावणीमध्ये आपणांकडून वकालतनामा दिलेले ॲड. परबकर हे देखील मे. उच्च न्यायालयात उपस्थित होते. त्यांमुळे मे. उच्च न्यायालयात सदर रिट पिटीशनचे केसमध्ये झालेल्या निर्णयाबाबत आपणांस सर्व बाबी ज्ञात असल्यामुळे करारपत्रात उल्लेख करणेत आलेला आहे.

तसेच सध्या राज्यस्तरिय तांत्रिक समिती (SLTC) कडून सदर अमृत ड्रेनेज प्रकल्पाच्या स्थापत्य कामांच्या निविदा स्वीकृतीबाबत सोमपाने केलेल्या ठरावास मान्यता देणेंबाबतचा निर्णय झालेला आहे. याप्रकारे निलेश पोतदार, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे संदर्भ क्र. ८ अन्वये दि.२६/०९/२०१८ रोजीचे पत्र सोमपा कडे प्राप्त झालेले आहे.

या सर्व बाबींबाबत इकडील कार्यालयाकडून दि.२८/०९/२०१८ रोजी मा. आयुक्त यांचेकडेस सादर करणेंत आलेल्या प्रस्तावांनुसार - मंजूर मक्तेदार दास ऑफ़शोअर इंजि. प्रा. लि. मुंबई यांचे समवेत तातडीने रितसर करारपत्र करुन त्यांना वर्क ऑर्डर देणेंबाबत व वर्कऑर्डर मध्ये - **मा. उच्च न्यायालयाचे अंतिम निर्णयांस अधिन राहून वर्कऑर्डर देणेंत येत आहे** - अश्या प्रकारे नमूद करणेंस संदर्भ क्र. ९ अन्वये मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

त्यांस अनुसरुन संदर्भ क्र. १० अन्वये आपणांस दिलेले सूचना आदेशांस अनुसरुन आपण संदर्भ क्र. ११ अन्वये सुरक्षित रकमेपोटी बॅक गॅरंटी सोमपा कडे जमा केलेली आहे. तसेच संदर्भ क्र. १२ अन्वये आपणांस दिलेल्या पत्रांस अनुसरुन आपण संदर्भ क्र. १३ अन्वये निविदेच्या विधीग्राह्यता कालावधी - Validity Period १२० दिवसाने म्हणजेच दि.२४/१०/२०१८ अखेरपर्यंत वाढवून दिलेबाबत पत्र दिलेले आहे. तसेच संदर्भ क्र. १४ अन्वये आपण सोमपा समवेत रितसर दस्तऐवज अनुक्रमांक: सपउ१-४७१९-२०१८ अन्वये दि.१२/१०/२०१८ रोजी नोंदणीकृत (रजिस्टर्ड) करारपत्र केलेले आहे.



Scanned by CamScanner

त्याअनुषंगाने उपरोक्त विषयांकित काम हे सार्वजनिक आरोग्य अभियंता, सोमपा यांचे अधिपत्याखाली उप अभियंता (ड्रेनेज) व मनपा नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) - महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सोलापूर यांचे मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली मुदतीत काम पूर्ण करावे.

| अ क्र | कामाचे नांव | मुळ निविदा रक्कम (स्थापत्य काम) | मक्तेदार यांचा मंजूर मक्त्याचा दर | काम पुर्ण करावयाचा कालावधी | बजेट | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान (AMRUT) अंतर्गत सोलापूर शहर भुयारी गटार योजना | र.रू. १७४,३८,४५,९८५/- | २.७०% कमी दराने | २४ महिने (पावसाळी कालावधी सह) | केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान | निविदा करारपत्रानुसार कामाची कार्यवाही राहील |

वरील उक्त कामाबाबत खालील बाबी निर्देशित करण्यात आलेल्या आहेत.

१) निविदेतील कामाची अंदाजित किंमत र.रु.१७४,३८,४५,९८५/- असून आपण २.७०% कमी दराची निविदा रक्कम र.रु.१६९,६७,६२,१४३/- इतक्या किंमतीस मंजूर करण्यात आलेली आहे. सन २०१६-२०१७ च्या चालू दरसुचीनुसार येणारी एकुण मुल्यांकित किंमत र.रु.१७८,३५,३५,८८४/- पेक्षा ४.८६% कमी दराची कलम-३८ साठी विचारात घेण्यात येत आहे.

२) सदर कामास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून काम पाहणार असल्याने त्यांचे मार्गदर्शनाखाली व त्यांची वेळोवेळी दिलेल्या थेट सुचनेप्रमाणे अनुपालन त्यांचे मार्फत करण्यात येईल.

३) वरील कामाचा विमा उतरविणे नियमाप्रमाणे बंधनकारक राहील तसेच विमा न उतरविल्यास कामाच्या किंमतीच्या १% रक्कम देयकातून वसूल केली जाईल.



Scanned by CamScanner

४) निविदेपूर्व बैठकीचे वृत्तांत (prebid) निविदेचा एक भाग समजणेत येत आहे व तो निविदेसोबत जोडला आहे. तरी सदर सर्व इतिवृत्तांत, टेंडर अटी व शर्ती व नोंदणीकृत (रजिस्टर्ड) करारपत्र हे या कार्यादेशाचा भाग समजणेत येत आहे.

५) वरील कामाची मुदत चोवीस महिने (पावसाळ्यासह) कालावधीसाठी राहील व तो वरील जावक दिनांकापासून धरण्यात येईल.

६) वरील कामाच्या कालावधीत स्विकृत निविदा प्रमाणे कामाची प्रगती ठेवणे आपल्यावर बंधनकारक राहील व त्यानुसार कामाचे नियोजन बारचार्ट या कार्यालयास सादर करावा.

७) संतोष अर्जुन कांबळे विरुध्द सो.म.पा. व इतर या याचिकेमध्ये आपण Respondent No. ४ म्हणून सामिल आहात. तरी मे. उच्च न्यायालयात दाखल असलेल्या रिट पिटीशन क्र.५७०२/२०१८ या केसचे **मा. उच्च न्यायालयाचे अंतिम निर्णयांस अधिन राहून वर्कऑर्डर देणेंत येत आहे**.

हे कार्यादेश दिले दि.१२/१०/२०१८.

१२/१०/१८

**प्र. सार्वजनिक आरोग्य अभियंता**
**सोलापूर महानगरपालिका सोलापूर**

प्रत - माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर

१) मा. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा. पां. जो. जाधव, सहसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) मा. आयुक्त, सो.म.पा.
४) मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे प्रादेशिक विभाग, पुणे.
५) मा. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, सांगली.
६) मा. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण. विभाग, सोलापूर
७) मा. मुख्य लेखापरिक्षक, सो.म.पा.
८) मा. मुख्य लेखापाल, सो.म.पा.
९) उप अभियंता (ड्रेनेज).
१०) नस्ती.

F:\Hibare 18 a\Amrut\Stnd\W O F.doc

Scanned by CamScanner